

REGISTERED No. B3434.



# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ४ जून १९४७ अंक २३




असल्या संस्थांचें कार्य थोर आहे; पण आपल्यापैकीं कोणासहि त्यांत जाण्याची पाळी येऊं नये असें वाटतें.

यावर विमा उतरणें हा एकच उपाय

—: प्रमुख सल्लागार :—

श्री. वा. ग. चिरमुले, बी. ए., एल्एल्. बी., प्रेसिडेंट

कॉन्सिल ऑफ डायरेक्टर्स, वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड... सातारा.

—: चेअरमन :—

श्री. डी. डी. देशपांडे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लिमिटेड... मुंबई.

* पहिल्याच मूल्यमापनांत नफा झाला आहे.

* डॉक्टरी तपासणीशिवाय रु. ९०० चा विमा घेता येतो.

★ लायसेन्सशिवाय एजन्सी घेतां येते.

—ठिकठिकाणीं ऑर्गनाइझर्स व एजंट्स् नेमणें आहेत.—

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

श्री. शि. न. कोल्हटकर,
बी. ए.,
मॅनेजिंग डायरेक्टर.

युवर ओन प्रॉव्हिडंट इन्शु. कं., लि.

वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई.

आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू

आरको निलगिरी तेल

लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी

महिंद्रकर ब्रदर्स

गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

# विविध माहिती

**मुंबई–श्रीनगर विमानांची ये–जा**—मुंबई ते श्रीनगर अशी प्रवासी विमानांची ये-जा लवकरच सुरू होणार असल्याचें काश्मीर दरबारनें जाहीर केलें आहे. ही वहातुक प्रथम सहा महिनेपर्यंत प्रयोगादाखल करण्यांत येणार असून त्यासाठी काश्मीर सरकारनें मुंबईच्या एका विमान कंपनीशीं कांहीं करारमदारही केले आहेत.

**सिंध प्रांतांत नवीन उद्योग–धंदे**—सिंधच्या सरकारनें आपल्या प्रांतांत कापडाच्या गिरण्या, जहाजें बांधण्याचे कारखाने, कांच सामान तयार करण्याचे कारखाने आणि शेतीच्या अवजारांचे कारखाने इत्यादि उद्योगधंदे काढण्याचें ठरविलें आहे. ह्यासाठी सिंध सरकारनें ४ कोटी रु. भांडवलाचें एक बोर्ड निर्माण केलें असून त्यापैकीं २५ टक्के भांडवल सरकार देणार आहे.

**पौंडी शिलकेच्या वाटाघाटीसाठी हिंदी शिष्टमंडळ**—इंग्लंडकडील हिंदुस्थानच्या पौंडी येण्याबद्दल वाटाघाटी करण्यासाठी हिंदी शिष्टमंडळ बहुधा जूनच्या दुसऱ्या आठवड्यांत इंग्लंडला जाण्यास निघेल. त्या मंडळांत पुढील मंडळींचा समावेश होईल असें समजतें:–मि. लिआकत अलीखान, डॉ. जॉन मथाई, श्री. राजगोपालाचारिअर, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास, श्री. मनु सुभेदार व मि. युसुफ हरून. त्याशिवाय सरकारी सल्लागार म्हणून सर चिंतामण देशमुख, श्री. बी. के. नेहरू, मि. नरहरी राव आणि मि. महंमदअली हेही जाणार आहेत.

**दिल्लीचे पहिले हिंदी चीफ कमिशनर**—दिल्ली प्रांताचे सध्याचे इंग्रज चीफ कमिशनर मि. ख्रिस्ती आणखी तीन महिन्यांनीं सेवानिवृत्त होणार असून त्यांच्या जागीं मि. खुर्शीद अली ह्या हिंदी अधिकाऱ्याची नेमणूक होणार असल्याची वार्ता आहे. मि. खुर्शीद अली हे कांहीं काळ डेहराडूनचे पोलिस कमिशनर होते.

**बंगालसाठी वीज निर्मितीची योजना**—बंगाल सरकारनें प्रांतांतील वीज पुरवठा वाढविण्यासाठी १४ कोटी रुपयांची एक योजना आखली आहे. ही योजना पांच वर्षांत पुरी व्हावयाची आहे.

**ट्यूबची आवश्यकता नसलेल्या टायर्स**—बी. एफ. गुडरिच कंपनीनें मोटारींच्या टायर्स बनविल्या आहेत, त्यांना आंत ट्यूबची आवश्यकता नाहीं.

**रूहर(जर्मनी)मधील कोळशाच्या उत्पादनांत घट**—रूहरमधील दगडी कोळशाच्या उत्पादनांत रोज दोन लाख टनांपर्यंत घट होत असल्याचें दिसून आलें आहे. ब्रिटिश परराष्ट्रमंत्री, मि. बेव्हिन, हे ह्या वस्तुस्थितीची प्रत्यक्ष पहाणी करण्यासाठी लवकरच रूहर प्रांताकडे जाणार आहेत. त्या वेळीं ते जर्मन कोळसा कामगारांच्या सभांतून ह्यासंबंधीं जाहीर भाषणें करणार आहेत.

**ताडी कामगारांना काम**—मद्रास सरकारनें आठ जिल्ह्यांत दारूबंदीचा प्रयोग सुरू केल्यामुळें ताडी गाळणारे सुमारें २० हजार कामगार बेकार झाले आहेत. त्या कामगारांना काम देण्यासाठी मद्रास सरकार कांहीं तजवीज करण्याच्या विचारांत आहे.

**चर्चिलनें हिंदुस्थानशीं युद्ध केलें असतें**—ब्रिटनचे युद्धकालीन मुख्य प्रधान मि. विन्स्टन चर्चिल आज अधिकारपदावर असते तर त्यांनीं हिंदुस्थानशीं युद्धच पुकारलें असतें, असे उद्गार मि. क्रॉसमन ह्या पार्लमेंटच्या जहाल मजूर सभासदानें काढले आहेत.

**जपानचें ॲटम बाँबचें संशोधन**—हिरोशिमा ह्या जपानी शहरावर अणु बाँब टाकण्यांत आल्यानंतर जपानी शास्त्रज्ञांनीं अणु बाँब शोधून काढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. अणु बाँबमुळें होणाऱ्या हानीची तपासणी करण्यासाठी गेलेल्या कमिशनमधील एका अमेरिकन शास्त्रज्ञानें ही माहिती जाहीर केली आहे.

**सुरतेच्या ड्रेनेजसाठी कर्ज**—सुरत म्युनिसिपल बोर्डानें शहराच्या ड्रेनेजसाठीं २७ लाख रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. या कामाला १९३९ सालीं ५३ लाख रुपये खर्च आला असता परंतु सध्याच्या महर्गतेमुळें १ कोटी, १० लाख रुपये खर्च येणार आहे. मुंबई सरकारनें ३३ टक्के खर्च देण्याचें आश्वासन दिलें आहे.

**मद्रास प्रांताचें औद्योगीकरण**—मद्रास प्रांतांतील उद्योगधंदे वाढविण्यासाठी सरकारनें एक नियोजन–समिति नेमली आहे. या समितीकडे प्रांताच्या औद्योगीकरणाच्या दीर्घकालीन आणि तात्पुरत्या योजना तयार करण्याचें काम सोपविण्यांत आलें आहे.

**मुंबई प्रांतांत धंदेशिक्षणाच्या शाळा**—मुंबई सरकारनें सातारा, हुबळी आणि विजापूर या तीन ठिकाणीं धंदेशिक्षणाच्या शाळा उघडण्याचें ठरविलें आहे असें समजतें. या शाळांना वसतिगृहाची जोड देण्यांत यावयाची आहे. इमारतीचें काम लवकरच सुरू करण्यांत येणार आहे.




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्यतितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ४ जून, १९४७




संस्थापक

मा. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कंपनी कायदा दुरुस्तीचें बिल

### ३२ वें व १३ वें कलम

गेल्या वर्षी हिंदुस्थान सरकारनें कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याकरितां मुंबई येथील एका सुप्रसिद्ध सॉलिसिटरची नेमणूक केली. त्यांत सरकारचा हेतु प्रस्तुत कायद्यांतील महत्त्वाचे दोष व अनिष्ट प्रथा नष्ट करण्याचा होता, अशीच अपेक्षा होती. परंतु आतां लोकमत अजमावण्याकरितां प्रसिद्ध केलेलें बिल पहातां, त्यामध्यें कांहीं कलमांच्या किरकोळ दुरुस्त्यांखेरीज विशेष कांहीं आढळत नाहीं. ह्या दुरुस्त्यांमुळें भागीदारांच्या हक्कांत महत्त्वाची भर पडत नाहीं किंवा व्यवस्थापकांवर फारशा नव्या जबाबदाऱ्याहि पडत नाहींत, असें म्हणावें लागतें. बिलाची उद्देशपत्रिकाहि महत्त्वपूर्ण नाहीं आणि त्यावरून बिलाचें अगत्यहि पटत नाहीं. तेव्हां कंपनी कायद्यांत किरकोळ दुरुस्त्या करण्याची आज आवश्यकता दिसत नाहीं. महत्त्वाच्या दुरुस्त्या करणारें एक व्यापक बिल मात्र सरकारनें जरूर लवकर तयार करवून त्याचा कायदा पास करून घ्यावा.

प्रसिद्ध झालेल्या डॉ. देशमुखांच्या बिलाचा परामर्श अर्थाच्या ता. ७ मे च्या अंकांत घेण्यांत आलेलाच आहे. प्रेसिडेन्सी इं. बँकेचे चेअरमन श्री. ग. रा. साठे ह्यांचा त्यावरील अभिप्राय आमच्या ता. २८ मे च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. पुण्यांतील दोन मोठ्या कंपन्यांशीं जबाबदारीच्या नात्याचा संबंध असलेल्या दोघा अभ्यासू व अनुभवी अशा आमच्या मित्रांनीं सरकारकडे आपलें बिलावरील मत पाठविलें आहे, त्यांत त्यांनीं फुटकळ दुरुस्त्यांबद्दल नापसंती दाखवून व्यापक दुरुस्त्या हातीं घेण्याची सरकारास सूचना केली आहे. ३२ व्या व १३१ व्या कलमांच्या दुरुस्त्यांवरील त्यांचा अभिप्राय उद्बोधक आहे. शेअर्स वर्ग करण्याच्या डायरेक्टरांच्या धोरणास प्रसिद्धी मिळावी असा ३२ व्या कलमाच्या दुरुस्तीचा उद्देश आहे. ज्यांचे नांवे शेअर्स वर्ग करण्यासाठीं अर्ज आले परंतु ते अमान्य करण्यांत आले, अशांची व त्यांतील समाविष्ट शेअर्सची यादी रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे नोंदण्याची सक्ती कंपन्यावर करण्यांत यावयाची आहे. जे रजिस्ट्रारच्या कचेरींत चौकशीला जाण्याची दगदग सोसतील त्यांसच फक्त हा तपशील उपलब्ध होऊं शकेल. अशी चौकशी करणारांची संख्या किती असणार ? तेव्हां, डायरेक्टरांच्या धोरणास प्रसिद्धी देण्याचा उद्देश अशा केवळ नोंदणीनें सफल होणार नाहीं. तो उद्देश सफल व्हवयाचा असेल तर ह्यासाठी डायरेक्टरांच्या रिपोर्टांसच हा तपशील जोडण्याचें बंधन असावें, म्हणजे आपोआपच तो रजिस्ट्रारच्या कचेरींत नोंदला जाऊन बिगर भागीदारांस उपलब्ध होईल व भागीदारांस तर तो हक्कानेंच मिळूं शकेल. ताळेबंदाच्या वर्षांतील अमान्य शेअर वर्गीची यादी अशा रीतीनें भागीदारांस दरसाल मिळत राहील.

बहुसंख्य डायरेक्टरांशीं सहमत न होणाऱ्या डायरेक्टरांस, डायरेक्टर रिपोर्टास भिन्न मतपत्रिका जोडण्याचा अधिकार १३१ व्या कलमाच्या नियोजित दुरुस्तीनें देऊं केला आहे. अल्पसंख्याकांची आज जी कुचंबणा होते, ती प्रस्तुत दुरुस्तीनें दूर होणार आहे. " सदर नियम कोठल्याहि कंपनीस हितावह होणार नाहीं, एवढेंच नव्हें तर त्यामुळें फायद्यापेक्षां तोटेच अधिक होतील " असें श्री. ग. रा. साठे यांचें मत आहे. भिन्न मतपत्रिकेचा व्याप स्पष्ट व मर्यादित असावा, असा प्रारंभीं उल्लेखिलेल्या मित्रद्वयांचा अभिप्राय आहे. डायरेक्टरास कंपनीच्या कारभाराविषयीं महत्त्वाची व अंतस्थ माहिती उपलब्ध असते आणि त्यास कागदपत्र पहावयास मिळतात. त्याचा दुरुपयोग होतां कामा नये, हें उघड आहे. विशेषतः बँका, विमा कंपन्या, इत्यादि प्रत्यक्ष पैशाशीं संबंध असणाऱ्या कंपन्यांचे बाबतींत अशी भिन्न मतपत्रिका नुकसानकारक ठरण्याचाहि संभव आहे. डायरेक्टरांच्या रिपोर्टाखाली सध्या डायरेक्टर बोर्डाचे वतीनें चेअरमन सही करतो, त्याऐवजी सर्व अनुकूल डायरेक्टरांच्या सह्या आवश्यक कराव्या आणि एवढ्यावरच हा प्रश्न सोडून द्यावा असेंच जबाबदारीचीं जाणीव असणारांचें मत होईल. भागीदारांस त्यांच्या मालकीच्या कंपनीच्या व्यवस्थेबाबत तपशीलवार माहिती मिळाली पाहिजे हें खरें असलें तरी अशा माहितीचा उपयोग झाला तर थोडाच होईल परंतु दुरुपयोग मात्र भयंकर होऊं शकेल असाच सार्वत्रिक अनुभव आहे. ह्या दृष्टीनें कंपनी कायद्याच्या दुरुस्तीच्या बिलांतील १३१ व्या कलमाची दुरुस्ती कंपन्यांच्या वा भागीदारांच्या हितास कितपत पोषक होईल, हें सांगणें कठीण आहे.

---

**बंगालमधील तीन नव्या कंपन्या**—भांडवल उभारणीस परवानगी दिलेल्या कंपन्यांच्या ताज्या यादींत सिगारेटचा कागद तयार करणारी " त्रिवेणी टिश्यूज लि. " ही बंगालमधील एक नवी कंपनी आहे. १ कोटि, ३० लक्ष रुपये भांडवल उभारण्यास तिला परवानगी मिळाली आहे. " मुस्लिम कमर्शिअल बँक लि. " ह्या बंगालमधील नव्या बँकेस २½ कोटि रुपये भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली आहे. कलकत्ता शहरास गॅस पुरविण्यासाठी १¾ कोटि भांडवलाची " कलकत्ता गॅस कं. ( प्रोप्रायटर लि. ) " ही कंपनी स्थापन होत आहे.

**बिहारमधील जमीनदारी**—बिहारमधील जमीनदारीचा शेवट करण्यासाठीं आणावयाच्या कायद्याला काँग्रेसच्या वरिष्ठ पुढाऱ्यांनीं मान्यता दिली आहे. या मान्यतेचें स्वागत करून श्री. सहाय यांनीं बिहारमधील शेतकऱ्यांना बिलामुळें आनंद होईल असे उद्गार काढले. श्री. सहाय हे बिहार प्रांताचे महसूल मंत्री आहेत.

**पुण्यांतील बँकर्स क्लिअरिंग हाउस अद्याप सुरू झालें नाहीं**— पुण्यांतील बँकर्स क्लिअरिंग हाउस ता. २८ मे रोजीं सुरू होणार होतें. परंतु, एका मोठ्या बँकेनें त्याचें सभासदत्व पत्करण्याचें अद्याप मान्य केलेलें नसल्यामुळें तें सुरू होऊं शकलें नाहीं असें समजतें.

**जपानमधील सर्वांत मोठें धरण**—अतिपूर्वेकडील व जपानमधील सर्वांत मोठें धरण टोकिओजवळ नुकतेंच बांधून तयार झालें. या धरणाचें नांव 'योस डॅम' असें असून त्याच्या वापराला १ जूनपासून प्रारंभ झाला.

## स्फुट विचार

### सरकारी परिषदेंत रिझर्व्ह बँकेविरुद्ध प्रांतिक बँकांची तक्रार

सहकारी सोसायट्यांच्या रजिस्ट्रारांची १५ वी परिषद मद्रास येथें डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या महिन्यांत भरली होती, तिचेमध्यें सहकारी संस्थांना कर्जें देण्याच्या रिझर्व्ह बँकेच्या धोरणावर बरीच कडक टीका झाली. शेतीच्या मोसमांतील कामास भांडवल पुरविण्यासाठी काढलेल्या हुंड्या व प्रॉमिसरी नोटा ह्यांचेवर व्याजांत १½% रीबेट देण्यास रिझर्व्ह बँक तयार असते. ह्यासंबंधांत श्री. रामलिंगम चेट्टियर ह्यांनीं आपला मद्रास प्रांतांतील अनुभव सांगितला. शेतीच्या तयार मालाच्या विक्रीपुरतेंच संकुचित क्षेत्र रिझर्व्ह बँकेनें पत्करलें आहे, तें व्यापक करून प्रत्यक्ष लागवडीस प्रोत्साहन मिळेल ह्या दृष्टीनें बँकेचें धोरण आखण्यांत आलें पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. मुंबई प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत बँकेच्या दिरंगाईबद्दल तक्रार केली. मु. प्रां. सहकारी बँकेस १९३१ सालीं कर्ज हवें होतें, तें इंपीरिअल बँकेकडून तात्काळ मिळूं शकलें परंतु रिझर्व्ह बँकेशीं वाटाघाटी दोन वर्षें चालू राहिल्या, असा अनुभव त्यांनीं निवेदन केला. प्राथमिक पतपेढ्यांच्या प्रॉमिसरी नोटांचे तारणावर रिझर्व्ह बँकेनें मध्यवर्ती व प्रांतिक सहकारी बँकांना तावडतोब कर्जें द्यावीं; प्रॉमिसरी नोटांचें वाचन स्वतः करण्याची अट ठेवूं नये, असें त्यांनीं सुचविलें. शेतकऱ्यांस द्यावयाच्या कर्जाची मुदत नऊ महिन्यांचे ऐवजी पंधरा महिने असावी, अशी सूचना ओरिसा प्रांतानें केलेलीच आहे. मालाचे तारणावर कर्जें देतांना रिझर्व्ह बँक लायसेन्स धारण करणाऱ्या गुदामांची पावती मागते; रिझर्व्ह बँकेनें प्रत्यक्ष माल वाटलें तर पहावा परंतु अशा कागदपत्रांची अपेक्षा करूं नये असेंहि श्री. सरय्या ह्यांनीं सांगितलें.

### रिझर्व्ह बँकेतर्फे खुलासा

रिझर्व्ह बँकेनें परिषदेंत भाग घेण्यासाठी श्री. के. सुबराव ह्यांना आपला प्रतिनिधि म्हणून धाडलें होतें. त्यांनीं रिझर्व्ह बँकेची भूमिका परिषदेस समजावून सांगितली. शेड्यूल्ड बँकेपेक्षां सहकारी संस्थांना अधिक सवलती देण्याची सक्ती कायद्यानें रिझर्व्ह बँकेस केलेली नाहीं, परंतु शेतकऱ्यांस ज्यास्तीत ज्यास्त सहाय करता यावें ह्यासाठीं बँक १½% चा रीबेट देत आहे; ह्या कर्जाबाबत बँकेनें कांहीं नियम केले आहेत त्यांपैकीं कांहीं निष्कारण जाचक आहेत असें बँकेला दाखवून देण्यांत आलें तर त्यांत सुधारणा करतां येईल, असें श्री. सुबराव म्हणाले. रिझर्व्ह बँकेजवळ पैसा भरपूर आहे ह्याचा, तिनें तो कोठेंहि फेकावा असा अर्थ मात्र नाहीं, असा त्यांनीं खुलासा केला. परत फेडीची मुदत नऊ महिन्यांऐवजी पंधरा महिन्यांची करण्यास रिझर्व्ह बँक कायद्यांतच दुरुस्ती करावी लागणार आहे. रिझर्व्ह बँकेकडून १½% दरानें कर्जें घेतल्यावर त्याचा फायदा मूळ कर्जदारांस कर्जें घेणाऱ्या बँकांनीं दिला पाहिजे. मालाच्या विक्रीच्या व शेतीच्या चालू व्यवहारापुरताच ह्या सवलतीच्या दराचा उपयोग केला जावा अशी अपेक्षा आहे. इतर कारणांसाठी रिझर्व्ह बँक नेहमीचा बँक रेट आकारील, हें त्यांनीं स्पष्ट केलें. रिझर्व्ह बँकेच्या दिरंगाईच्या कारभाराबद्दल त्यांनीं कर्ज मागणाऱ्या बँकांसच दोष दिला. बँकांनीं आपल्या गरजा अगोदरच ओळखून त्यांप्रमाणें वेळींच कर्जमागणी केली तर प्रत्यक्ष कर्ज देण्यास लागणाऱ्या वेळेपेक्षा अधिक वेळ लागण्याचें कारणच पडणार नाहीं, फारतर एक महिना अवधि लागेल, असें श्री. सुबराव ह्यांनीं सांगितलें. अखेर, प्रांतिक सहकारी बँका व रिझर्व्ह बँक ह्यांचेमधील संबंधांचा विचार सर फिरोज खारेघाट ह्यांच्या सूचनेप्रमाणें एका समितीकडे सोपविण्यांत आला.

### ब्रिटिश हिंदुस्थानांतील बाहेरील बँकांच्या शाखा

बँकांनीं आपल्या शाखा ठिकठिकाणीं, तेथें धंद्यास पुरेसा वाव आहे किंवा नाहीं ह्याचा विचार न करतां, काढल्या. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी बँकिंग कंपनीज (रिस्ट्रिक्शन ऑफ ब्रँचेस) ॲक्ट हा कायदा करावा लागला. ब्रिटिश हिंदुस्थानांत शाखा काढावयाच्या अगर बंद करावयाच्या असतील, तर रिझर्व्ह बँकेची आगाऊ परवानगी घेण्यांत आली पाहिजे असें बंधन प्रस्तुत कायद्यानें बँकांवर घातलें. तथापि, ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या बँकांना हा कायदा लागू नसल्या कारणानें त्या ब्रिटिश हद्दींत नव्या शाखा उघडूं शकतात. कायद्यामधील ह्या दोषाकडे हिंदुस्थान कमर्शिअल बँक लि.चे चेअरमन, सर पद्मपाद सिंघानिया ह्यांनीं लक्ष वेधलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील बँकांवर ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर शाखा उघडण्याबाबत बंधन नाहीं, हें खरें आहे; परंतु ब्रिटिश हिंदुस्थानांतील बँकांना जेथें वाव असेल, अशाच फक्त बाहेरील ठिकाणच्या बँकांस ब्रिटिश हिंदुस्थानांत लायसेन्सशिवाय शाखा काढण्याची मुभा असावी, इतरांस असूं नये, असें सर पद्मपाद ह्यांनीं सांगितलें. बँकिंग कंपन्यांबाबत नव्या कायद्याच्या मसुद्यावरील सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टाचाहि त्यांनीं उल्लेख केला. पैशाच्या बाजाराशी व बँकिंगच्या जगाशी रिझर्व्ह बँकेचा निकट संबंध यावा ह्याकरितां रिझर्व्ह बँकेनें बँकिंगच्या क्षेत्राचें एक प्रातिनिधिक सल्लागार मंडळ नेमावें म्हणजे त्या मंडळाचें मत रिझर्व्ह बँक वेळोवेळ घेऊन त्यास सल्लाहि पण देऊं शकेल, ही सर पद्मपाद ह्यांची सूचना विचारार्ह आहे.

### शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडे ठेवावें लागणारें डिपॉझिट

शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडे त्यांच्या ठेवींच्या विवक्षित प्रमाणांत रकमा ठेवाव्या लागतात. ह्या डिपॉझिटवर रिझर्व्ह बँक मुळींच व्याज देत नाहीं, इतकेच नव्हे तर त्याच्या तारणावर शेड्यूल्ड बँकांना कर्जेहि मिळूं शकत नाहीं. वास्तविक, रिझर्व्ह बँकेच्या स्वतःच्या कारभारासाठी ह्या ठेवींची जरूरी नाहीं; तिचेजवळ भरपूर पैसा नेहमी असतो. अशा रीतीनें रिझर्व्ह बँकेजवळील ठेवी अनुत्पादक तर होतातच, परंतु त्याबरोबर त्यांचा बँकांच्या व्यवहारासहि उपयोग होत नाहीं. वरील तक्रारीचे समर्थनार्थ खालील आकडे सर पद्मपाद ह्यांनीं दिले आहेत:—

| वर्ष | शेड्यूल्ड बँका (संख्या) | त्यांची देणीं (संख्या) | त्याचे जवळील रोख रकम (कोटी रु.) | त्यांनीं रिझर्व्ह बँकेंत ठेवलेलें डिपॉझिट (कोटी रु.) |
|---|---|---|---|---|
| १९३५–३६ | ५० | २२० | ६ | ३२ |
| १९३९–४० | ५९ | २४५ | ७ | १७ |
| १९४५–४६ | ९१ | ९१४ | ३५ | ९० |

रिझर्व्ह बँकेकडील डिपॉझिट सरकारी रोख्यांचे स्वरूपांत ठेवण्यास काय हरकत आहे? त्यामुळें तरतेपणास बाध न येतां बँकांचें उत्पन्न वाढेल. हिंदुस्थानांत अद्याप हुंड्यांच्या डिस्कौंटिंगची प्रथा पडलेली नाहीं, इतकेच नव्हे तर आपल्या जवळील हुंड्या बँका इतर बँकांकडे रीडिस्कौंट करून घेऊं लागल्या तर तें अक्रमपणाचें लक्षण समजलें जाणार नाहीं अशी परिस्थिति आहे. रिझर्व्ह बँकेकडे शेड्यूल्ड बँकांना कायद्याप्रमाणें ठेवाव्या लागणाऱ्या डिपॉझिटचे बाबत सर पद्मपाद ह्यांचे वरील विचार उद्‌बोधक वाटतील.

## रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण

२३-५-४७

| | |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | रु. |
| अ सोनें व सोन्याचीं नाणीं:— | |
| हिंदुस्थानांतील साठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील साठा | ... ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,३५,३२,८९,००० |
| अची बेरीज | ११,७९,७४,३४,००० |
| ब रुपयाचीं नाणीं | २६,०५,४५,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,१४,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी (चलनी नोटांची एकूण रक्कम) | १२,६३,६३,९३,००० |

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
|---|---|---|---|
| ॲडार्टस लि., मुंबई | जाहिरात एजंट | १०,००,००० | भांडवल वाढ |
| जे. बी. अडवाणी आणि कं., मुंबई. | कागद, यंत्र-सामुग्री, हार्ड-वेअर, कापड. | १२,००,००० | भांडवल वाढ |
| पुलगांव कॉटन मिल्स, लि., मुंबई. | जिनिंग, प्रेसिंग, स्पिनिंग, वीव्हिंग | २०,००,००० | ......... |
| कमला शुगर मिल्स लि., मद्रास. | साखर इ. | २५,००,००० | भांडवल वाढ |
| श्री. हनुमान ज्यूट मिल्स लि., बंगाल. | तागाच्या गिरण्या. | १,५०,००,००० | नवी कंपनी |
| सेंचरी स्पि. अँड मॅ. कं. लि. मुंबई. | सूत-रेशीम विणणें. | ७,४६,१०० | भांडवल वाढ |

**रशिआंत फांशीची शिक्षा रद्द**—रशिआंतील कामगार संघ व इतर संस्था यांचें मत लक्षांत घेऊन सोव्हिएट सरकारनें फांशीची शिक्षा रद्द करून त्याऐवजीं जास्तीत जास्त २५ वर्षांची कैदेची शिक्षा ठेवली आहे. १९१७ मध्यें झार शाही उलथून पडल्यावर ही शिक्षा रद्द करण्यांत आली होती. परंतु १९२६ सालीं सोव्हिएट सरकारविरुद्ध गंभीर गुन्हे करणारांना ही शिक्षा देण्यांत यावी असा कायदा करण्यांत आला होता.

**दंतवैद्यांसाठी नवा कायदा**—दंतवैद्यांच्या धंद्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि दंतवैद्यांचीं मंडळें स्थापन करण्यासाठी एक बिल मध्यवर्ती कायदे मंडळांत सरकारतर्फे मांडण्यांत येणार आहे, असें मद्रास सरकारनें काढलेल्या एका पत्रकावरून समजतें.

**ब्रिटिश सरकारी मालकीच्या मध्यवर्ती बँकेचा रिपोर्ट**—बँक ऑफ इंग्लंड ब्रिटिश सरकारच्या मालकीची झाल्यानंतरच्या पहिल्या वर्षाचा बँकेचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, त्यांत चलन, राष्ट्रीय कर्ज, क्लिअरिंग बँका, डिस्कौंट मार्केट, परराष्ट्रांशीं चलनाविषयक करार, इत्यादींची माहिती देण्यांत आली आहे.

## विविध माहिती

**मध्य पूर्वेतील अमेरिकन अधिकार**—अमेरिका आणि मध्यपूर्वेकडील देश ह्यांच्यांतील संबंधांची चर्चा करण्यासाठी, अमेरिकेनें त्या भागांतील आपल्या सर्व अधिकाऱ्यांना वॉशिंग्टनला बोलाविलें आहे असें समजतें.

**रशिआंतील खनिज द्रव्यांचा जारीनें शोध**—रशिअन सरकारनें देशांतील खनिज संपत्तीचा शोध लावण्यासाठी फार मोठी मोहीम चालू केल्याचें वृत्त आहे. ह्या मोहिमेंत ६० हजारांवर शास्त्रज्ञ भाग घेणार असून ८०० ठिकाणीं हें संशोधन करण्यांत येणार आहे. ॲटम बॉंबसाठी लागणारें युरोनिअम अगर तत्सम इतर खनिज पदार्थ शोधणें हा प्रस्तुत मोहिमेचा हेतु असावा असा अंदाज आहे.

**औद्योगिक संरक्षण व सहाय ह्यासाठी अर्ज**—ज्या उद्योगधंद्यांसाठी संरक्षण अथवा सहाय मागणारे अर्ज सरकारकडे अजून दाखल करण्यांत आलेले नसतील, त्या उद्योगधंदेवाल्यांनीं आपले अर्ज जुलै, १९४७ चे अखेरीचें आंत व्यापार खात्याकडे दाखल करावेत अशी जाहीर सूचना मध्यवर्ती सरकारतर्फे देण्यांत आली आहे. जुलै १९४७ नंतर मालाच्या आयातीवरील सर्व अनावश्यक निर्बंध दूर करण्यांत येणार आहेत. सबब, सरकारी सहायाची अथवा संरक्षणाची आवश्यकता असलेल्या उद्योगधंदेवाल्यांनीं आपल्या मागण्या साधार व त्वरित पाठवाव्या. आयातीवर अनावश्यक बंधनें असूं नयेत अशी सार्वत्रिक मागणी असल्यामुळें संरक्षणाचा प्रश्न जुलै,१९४७ अखेर सरकार निकालांत काढणार आहे.

**दि सांगली बँक लि.**—वरील बँकेचें वसूल भांडवल ३ लक्ष रु. व रिझर्व्ह फंड २ लक्ष रु. मिळून ५ लक्ष रुपयांचें स्वतःचें भांडवल झालें असून ती लवकरच शेड्यूल्ड होण्याच्या मार्गावर आहे, असें समजतें.

**दि बँक ऑफ कराड, लि**—वरील बँकेनें पहिल्या नऊ महिन्यांचा डिसेंबर १९४६ अखेरचा आपला ताळेबंद तयार केला आहे. बँकेचें वसूल भांडवल १½ लक्ष रु. असून तिचें खेळतें भांडवल अल्पावधींत १२½ लक्ष रु. झालें आहे. व्यवहारांत २,२४२ नफा उरला त्यापैकी १,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. प्राथमिक खर्च, शेअरविक्री खर्च वगैरे बाबी जिंदगीचे बाजूस अजिबात नाहींत. डायरेक्टरांनीं फी व मॅनेजिंग डायरेक्टरांनीं मेहनताना न घेतां काम केलें आहे. श्री. ल म. देशपांडे हे बँकेचे चेअरमन असून श्री. विष्णु दत्तात्रय शिराळकर हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

**इराणचें देणें अमेरिकेनें दिलें**—युद्धकालांत इराणच्या रेल्वेजनीं अमेरिकन लष्कराच्या केलेल्या वहातुकीबद्दल अमेरिकेनें इराण सरकारला ४० हजार डॉलर्स देऊन हिशेब मिटवून टाकला.

**रे म्युझिअममध्यें हैद्राबादचा ग्रामोद्योग**—रे महाराष्ट्र औद्योगिक म्युझिअममध्यें हस्तकौशल्य व ग्रामोद्योग या विभागाची मांडणी करण्यासाठी निजाम सरकारनें ५ हजार रुपये किंमतीच्या वस्तू संस्थेला देण्यासाठी मंजूर केल्या आहेत.

**हिंदी व्यापारी शिष्टमंडळाची जपानला भेट**—हिंदुस्थान सरकार एक व्यापारी शिष्टमंडळ जपानकडे जूनच्या पहिल्या आठवड्यांत पाठवीत आहे. हिंदी कपाशीचा जपानमध्यें खप घडवून आणण्याची आणि हिंदुस्थानासाठी जपानी कपास-कापड, सूत, रेशमी कापड, इत्यादि मिळविण्याची खटपट हें शिष्टमंडळ करील. गिरण्यांस लागणारी कांहीं जपानी यंत्रसामुग्रीहि शक्य तर मिळविली जाईल.

### होळकर संस्थानच्या सहकारी खात्याचा अहवाल

होळकर संस्थानच्या सहकारी खात्याचा १९४४–४५ चा अहवाल प्रतिवर्षीप्रमाणें आमचेकडे आला आहे. खात्यांतील वरिष्ठ व कनिष्ठ जागा रिकाम्या राहिल्या व अनेक फेरफार झाले त्या कारणानें खात्याच्या मामुली कामांत व्यत्यय आला, इतकेंच नव्हे तर ऑडिट, तपासणी, वांध्यांचे निवाडे, इत्यादि कामेंहि थकलीं. लायक व तज्ज्ञ माणसें सहकारी खात्याकडे आकर्षिलीं जावीं, ह्या दृष्टीनें अधिकारी व नोकर ह्यांच्या पगाराचें मान वाढविण्याविषयीं सूचना रजिस्ट्रार, श्री. शेलेंकर, ह्यांनीं आपल्या रिपोर्टांत केली आहे. खात्यास अंदाजपत्रकांत ४२,८४९ रु. मंजूर आहेत; परंतु प्रत्यक्ष खर्च ३३,०८३ रु. च झाला, कारण कित्येक जागा रिकाम्या राहिल्या होत्या. सहकारी सोसायट्यांबाबत कायद्याच्या दुरुस्तमुळें देखरेख व नियंत्रण ह्याचें काम सुलभ होईल अशी अपेक्षा आहे. पतपेढ्यांच्या पुनर्घटनेचें काम बरेच यशस्वी झालें आहे आणि कित्येक सहकारी संस्थांनीं वाढीच्या योजना आंखल्या आहेत. तथापि, आवश्यक त्या सरकारी मंजुऱ्यांच्या अभावीं प्रगतीचें पाऊल थकलें आहे असें सालोसालच्या रिपोर्टांवरून दिसून येतें. सहकारी संघटनेचें महत्त्व सरकारास पटून त्या चळवळीस योग्य त्या महत्त्वाचें स्थान प्राप्त होणें आवश्यक आहे. परिस्थितीच्या मानानें सहकारी खात्यानें उत्कृष्ट कार्य चालविलें आहे, असेंच म्हटलें पाहिजे.

---

### हिंदी बँकांच्या शाखांत वाढ

### ९२ दिवसांत २६३ नव्या कचेऱ्या

३१ डिसेंबर १९४६ अखेर संपलेल्या तिमाहींत हिंदी शेड्यूल्ड बँकांनीं २६३ नव्या कचेऱ्या उघडल्या व २२ बंद केल्या. म्हणजे त्यांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या ३,२७८ वरून ३,५१९ वर गेली. इंपीरिअल बँकेनें ९ नव्या कचेऱ्या स्थापून २ बंद केल्या, त्यामुळें तिच्या एकूण कचेऱ्यांची संख्या ४४५ झाली. पंजाब नॅशनल बँक ५५, भारत बँक २५, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स १८, लक्ष्मी बँक १४, आंध्र बँक ८, कॅनरा बँक ८, नाथ बँक ८, अशी प्रमुख बँकांची शाखावाढ आहे. नव्या २६३ कचेऱ्यांपैकी ६३ पंजाबमध्यें व ३८ मद्रासमध्यें उघडण्यांत आल्या. संयुक्त प्रांताच्या वांट्यास ३१, मुंबई प्रांताच्या वांट्यास ३० आणि मध्यप्रांत-वऱ्हाडच्या वांट्यास २६ शाखा आल्या. बाकीच्या शाखा इतर प्रांत आणि संस्थानें ह्यांत स्थापन केल्या गेल्या. शाखावाढीवरील कायद्याचें नियंत्रण प्रभावी होण्यापूर्वी बँकांनीं शाखा स्थापन करून ठेवण्याची घाई केली, त्याचें प्रतिबिंब वरील आकड्यांत दिसून येतें.

---

### राजकीय पक्षांची रेडिओवरील भाषणें

ब्रिटिश रेडिओवरून बोलण्याची तेथील राजकीय पक्षांना परवानगी आहे. चालू वर्षी अशीं बारा भाषणें होण्यास बी. बी. सी. नें संमति दिली आहे. गेल्या निवडणुकींत वेगवेगळ्या पक्षांना मिळालेल्या मतांचे प्रमाणांत रेडिओवरील भाषणांची वेळ वांटून देण्यांत आलेली आहे. अधिकारारूढ मजूर पक्षाच्या वांट्यास सहा भाषणें आलीं असून विरोधी पक्षास पांच भाषणें करतां येतील. लिबरल पक्षाचे वांट्यास एक भाषण येईल. कोणत्या वक्त्यानें व कोणत्या विषयावर बोलावयाचें, हें ज्या त्या पक्षानें ठरविण्याचें आहे. सरकारचे मंत्री माहिती देणारीं अथवा खुलासा करणारीं भाषणें रेडिओवर करतात, त्यांचा समावेश वरील बारा भाषणांत नाहीं. परंतु, एखाद्या मंत्र्यानें वादग्रस्त मुद्दा उपस्थित केला तर विरोधी पक्षास उत्तर देण्याचा हक्क आहे.


गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर



विजय टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स.

## मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

स्वदेशी रु. २७ दि. २८।५।४७

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २०।५।४७ | बुधवार २१।५।४७ | गुरुवार २२।५।४७ | शुक्रवार २३।५।४७ | सोमवार २६।५।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९१७-८; १५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | १७६५ | १६४५ | १८१७-८ | १६५५ | १९४७-८ |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३५४ | ३६५-८ | ३६२ | ३६७-८ | ३८१ |
| ६५; ३६-४ | ०-८-० S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २१-९ | २४-२ | २३-८ | २४-१२ | २५-६ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-० S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | २७-८ | २९-१२ | २८-१२ | ३० १० | ३१-१२ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३२७७-८; २१३२-८ | ४०-०-० S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ९४० | ९७२-८ | ९६० | ९९० | १०२७-८ |
| ११८०; ६५८ | १३-०-० S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ५९७ | ६११ | ६१३ | ६२४ | ६४१-० |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ५९३ | ५८९ | ५९२ | ६१० | ६१७ |
| ४६७; ३९८ | २-०-० † | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २७३ | २७६ | २७४ | २७७ | २८१ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | २८२ | २९० | २८८ | २९० | २९३ |
| ५७१; ३२३ | १२-०-० S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | २८० | २८७ | २८६ | २८९ | २९३ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३१२ | ३१९ | ३२६ | ३२७ | ३३७ |
| १०-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-८-६ | ३-११ | ३-१०-६ | ३-११-६ | ३-१२-६ |
| ३९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १४-५ | १४-१५ | १४-११ | १५-० | १५-४ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | २-८ | २-११ | २-९-६ | २-१०-६ | २-१३ |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५०३-१२ | ५१६-४ | ५१२-८ | ५१४ | ५३१-४ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | १६५-४ | १६९ | १६७ | १७० | १७१-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २४० | २४६ | २४५ | २५४ | २६५ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४४० | ४२२-८ | ४१७-८ | ४२५ | ४४२-८ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | २७-६ | २८-१३ | २८-८ | २९-४ | ३१-१४ |

## ब्रिटिश व्यापाराचें स्वतंत्र हिंदुस्थानांतील भवितव्य

हिंदुस्थानचें राजकीय भवितव्य ठरविण्यासाठीं गेल्या सालीं जाहीर करण्यांत आलेली १६ मेची योजना अनिश्चिततेचे हेलकावे खात आहे. १९३५ सालच्या घटना-कायद्यान्वये ब्रिटिश व्यापारी हितसंबंधांना हिंदुस्थानांत देण्यांत आलेल्या सवलती नव्या मनूंत टिकणार किंवा नाहीं हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदी राजकीय पुढारी व जनताही त्या सवलतींच्या विरुद्ध असली तरी ब्रिटिश व्यापारी वर्ग त्यांना चिकटून रहाण्याचा आटोकाट प्रयत्न करील, हें उघड आहे. लंडनमध्यें जनरल स्लिम यांनीं ब्रिटिश व्यापारी वर्ग व हिंदुस्थानांतून सेवानिवृत्त झालेले ब्रिटिश सनदी नौकर यांच्यासमोर केलेलें भाषण यासंबंधी लक्ष देण्यासारखें आहे. जनरल स्लिम यांच्या भाषणाचा मतितार्थ असा कीं ब्रिटिश व्यापारी हितसंबंधांनीं हिंदुस्थानांतील राजकीय घडामोडींची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. व्यापाऱ्यांनीं आपल्या धोरणांत व कार्यपद्धतींत योग्य तो बदल केल्यास त्यांना अजूनहि हिंदुस्थानांत पुष्कळ कार्यक्षेत्र आहे. जनरल स्लिम यांनीं हिंदुस्थानांत ३० वर्षेपर्यंत नौकरी केलेली असल्यामुळें त्यांनीं केलेलें मतप्रदर्शन अनुभविक व म्हणूनच विचार करण्यासारखें आहे. जनरल स्लिम यांनीं वरील भाषण एका खान्याच्या प्रसंगीं केलेलें आहे. अशा वेळीं करण्यांत येणाऱ्या भाषणांतून जो खुबीदार संदिग्धपणा असावा लागतो तो त्यांच्या भाषणांत भरपूर आहे. तथापि अलीकडे ब्रिटिश हितसंबंध आणि एतद्देशीय कारखानदार यांची जी धंदेवाईक एकजूट हिंदुस्थानांत दृष्टीस पडूं लागली आहे, तीवरून वरील सारखीं भाषणें निदान हिंदी जनतेला तरी मुळींच संदिग्ध वाटत नाहींत. ब्रिटिश लोक राज्यकर्ते म्हणून हिंदुस्थानांत अप्रिय झाले असले तरी व्यापारी या नात्यानें ते लोकप्रियच आहेत असें एक विधान जनरल स्लिम यांनीं केलें. ह्या लोकप्रियतेचें क्षेत्र अर्थातच हितसंबंधी लोकांपुरतेंच आहे. मर्यादित व्यापार आणि राजकारण यांचे संबंध काय व कशा प्रकारचे असतात याची जाणीव असलेली जागरूक हिंदी जनता तरी असल्या भ्रामक युक्तिवादानें फसणार नाहीं. ब्रिटिश व्यापारी लोक आपलें बस्तान टिकविण्याचा प्रयत्न कोणत्या प्रकारें करतील व त्यांनीं विणलेल्या हितसंबंधांच्या जाळ्याचा राष्ट्रीय व्यापक धोरणावर आणि राजकारणावर काय परिणाम होणें शक्य आहे ह्याची कल्पना येण्यास ज. स्लिम ह्यांचें भाषण पुरेसें आहे.

---

**एंजिनिअरिंग कॉलेजांत स्त्रियांना प्रवेश**—रूरकी ( संयुक्त प्रांत ) येथील एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें स्त्रियांना प्रवेश देण्याचा निर्णय ह्या कॉलेजच्या १०० व्या वाढदिवसानिमित्त घेण्यांत आला. हें कॉलेज पूर्वेकडील देशांतील सर्वांत जुनें आहे असें म्हणतात.

**दुभत्या गाई**—अमेरिकेंतील डेअऱ्यामधील गाईंची संख्या २% कमी झाली असली तरी दुधाचें उत्पादन मात्र ३% वाढलें आहे.

**नव्या फर्म्स व त्यांतील कामगार**—अमेरिकेंतील फर्म्सपैकी २०% फर्म्स गेल्या तीन वर्षांतच स्थापन झालेल्या आहेत. युद्ध-समाप्तीनंतर स्थापन झालेल्या ६,७०,००० फर्म्सपैकीं फक्त १०,००० फर्म्समध्यें विसापेक्षा ज्यास्त कामगार आहेत.

**पावसावर हुकमत चालणार ?**— सोव्हिएट शास्त्रज्ञांनीं ढग आले असतांना पाहिजे तेव्हां पाऊस पाडण्याच्या कामीं कांहीं प्रमाणांत यश मिळविलें आहे असें समजतें. पण याही पुढें जाऊन नको असेल तेव्हां तो बंद करण्याचे प्रयत्न हे शास्त्रज्ञ आतां करीत आहेत. त्यांच्या मतें, पाऊस बंद करण्याची कल्पना अशक्य कोटींतली राहिलेली नाहीं.

### मुंबई प्रांतांतील ग्रामोद्योग—परदेशांत मागणी

मालाची विक्री करण्यासाठीं ठिकठिकाणच्या सहकारी संस्था, औद्योगिक प्रदर्शनें वगैरेंचा उपयोग करून घेण्यांत यतो. १९४५-४६ च्या अहवालावरून सर्व विक्री केंद्रें आपल्या पायावर उभीं राहिलीं असल्याचें दिसून येतें. हस्तिदंत व चंदन यावरील नक्षीकामाच्या शोभेच्या वस्तूंना परदेशांत चांगला भाव येतो असा अनुभव असल्यामुळें त्या निर्यात करण्याची व्यवस्था करण्याचे प्रयत्नहि करण्यांत येत आहेत. त्यासाठी परदेशांतील हिंदी ट्रेड कमिशनर व इतर सरकारी व्यापारी संस्था यांची मदत घेण्यांत येत आहे. सध्याची देशांतील कापडाची टंचाई लक्षांत घेऊन हातमागावरील कापडाची परदेशी मागणी स्वीकारूं नये असें सरकारनें ठरविलें असलें तरी टेबलावरील चादरी, बिछान्यावरील चादरी, टॉवेल इत्यादि मालाला ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंडसारख्या देशांतून मागणी आहे. कापड टंचाई कमी झाल्यावर या बाजारपेठांचा उपयोग करून घेणें आवश्यक आहे.

---

**हिंदुस्थानचा नुकसान भरपाईचा वाटा**—दोस्त राष्ट्रांच्या संयुक्त नुकसान-भरपाई एजन्सीनें हिंदुस्थानचा नुकसान भरपाईचा वाटा म्हणून एक पोलादाचा कारखाना, एक वीज उत्पन्न करण्याचा कारखाना आणि शस्त्रास्त्रांच्या चार कारखान्यांतील कांहीं यंत्रसामुग्री देऊं केली आहे.

**जून महिन्यापासून निकेलचे रुपये**—हिंदुस्थान सरकारनें निकेलचे रुपये पाडण्याचा अधिकार सरकारी टांकसाळीला दिला असून हीं नवीं नाणीं १ जून, १९४७ पासून व्यवहारांत येण्याचें जाहीर झालें आहे.


**अणु-शक्तीचा हिंदी अभ्यासक**—कलकत्ता विद्यापीठांतील डॉ. नाग यांना अणु-शक्तीच्या अभ्यासासाठी परदेशीं पाठविण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. डॉ. नाग ह्या बाबतींतील अद्यावत् संशोधनाशीं परिचय करून घेण्यासाठी लवकरच प्रयत्न करतील.


**नर्मदा-तापीवरील धरणें लवकर बांधा**—नर्मदा व तापी नद्यांवरील धरणांची संकल्पित योजना सरकारनें लवकर हातीं घ्यावी अशी सूचना सुरत चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे मध्यवर्ती सरकारचे मंत्री श्री. भाभा यांना करण्यांत आली आहे. ह्या नद्यांना येणाऱ्या अफाट पुरामुळें त्यांचें पात्र बदलतें आणि त्यामुळें प्रत्येक पुराच्या वेळीं अनपेक्षित अशा नव्या शेतांची नुकसानी होते असें कळविण्यांत आलेलें आहे.


**रशिअन लोकांना कम्युनिझम विरुध्द उठविणें अशक्य?**—असोसिएटेड प्रेस ऑफ अमेरिका या वृत्तसंस्थेचे कार्यकारी संचालक मि. केंट कूपर यांनीं वृत्तपत्र व्यवसायिकांच्या एका कॉलेजमध्यें भाषण केलें. अमेरिकन प्रचारामुळें रशिअन लोकांना सोव्हिएट सरकारविरुध्द उठविणें अगर तेथील कम्युनिझमचा नाश करणें यांपैकीं कांहींहि साध्य होण्यासारखें नाहीं; पूर्व युरोपांतील कम्युनिझमचा प्रयोगही थांबवितां येणें शक्य नाहीं असे उद्गार त्यांनीं आपल्या भाषणांत काढले. अमेरिकन प्रचाराचा परिणाम उलटा होण्याचा मात्र संभव आहे असा इशाराहि त्यांना दिला.

**महत्वाच्या जलमार्गावर आंतरराष्ट्रीय ताबा**—अमेरिकेचे माजी व्यापारमंत्री मि. हेन्री वॉलेस यांनीं एका भाषणांत सुएझ कालवा, पनामा कालवा आणि डार्डनेल्स सामुद्रधुनी यांच्यावर आंतरराष्ट्रीय ताबा असावा असें सुचविलें. त्यांच्या मतें असें केल्यास जागतिक शांतता टिकविण्यास बरीच मदत होऊं शकेल.






हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.